" कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास "

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या

मानव्य विद्याशाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठीच्या शोध प्रबंधाचा प्रारुप आराखडा

:: संशोधक ::

श्री. जगदीश केशवराव ससाणे

सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,

टी. के. कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय,

नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

:: मार्गदर्शक ::

डॉ. डी. एन. दामावले

संशोधन मार्गदर्शक,

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

पंडीत दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय,

देवणी, जि. लातूर (महाराष्ट्र)

:: संशोधन केंद्र ::

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,

लातूर, जि. लातूर (महाराष्ट्र)

मार्च 2022

"कोल्हापूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास"

प्रस्तावना :

जगातील जवळपास सर्वच देशांच्या आर्थिक विकासाची सुरुवात शेतीपासून झालेली आहे. शेती हा आर्थिक विकासाचा पाया आहे. अनेक समाजशास्त्रज्ञ आणि अर्थतज्ञांनी आर्थिक विकासातील शेतीचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे.

भारताचे पहिले प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरु म्हणतात की, "अन्य कोणत्याही गोष्टीसाठी थोडे थांबून लक्ष दिले तरी चालेल पण शेतीकडे विलंबाने लक्ष देऊन चालणार नाही."

महात्मा गांधीनी दिलेला कृषी संदेश ही तितकाच महत्त्वाचा ठरतो. "भारतीय शेतकरी, खेडूत, खेडवळ दिसत असला तरी त्याच्यात पुरातन संस्कृती निवास करत असल्यामुळे त्याचे अंतरंग अध्यात्माने भरलेले आहे. ही गोष्ट तुम्हाला पाश्चिमात्य देशांमध्ये कधीच सापडणार नाही. त्याचे अठराविश्व दारिद्रय व निरक्षरता नष्ट केले, त्याला स्वसामथ्र्यांची कल्पना दिली तर देशाची उन्नती फार लांब नाही. चिकित्सक शेती करेल तोच या देशाचा आणि मातीचा सुसंस्कृत व स्वतंत्र नागरिक असेल."

अठराव्या शतकाच्या मध्यात फ्रान्समध्ये उदयास आलेल्या निसर्गवादी विचारसरणीने शेतीला सर्वोच्च स्थान दिलेले होते. निसर्गवाद्यांच्या मते शेतीमध्ये मुठभर धान्य पेरले की पोतेभर धान्य उगवते, या पोतेभर धान्यातून मुठभर धान्य बाजुला काढल्यास उर्वरित पोतेभर धान्य म्हणजेच वाढावा होय. वाढाव्याची निर्मितीही फक्त शेतीतच होते म्हणून शेती हा एकमेव उत्पादक

व्यवसाय आहे. फ्रान्स मध्ये झालेल्या दारिद्र्यवाढी संदर्भात मिमांसा करताना निसर्गवादी म्हणतात की, "शेतकरी दरिद्री असल्याने राज्य गरीब राहील, आणि अशा राज्याचा शासक ही गरीब राहील"

सनातनवादी अर्थतज्ज्ञ डेव्हिड रिकार्डो यांनी सुद्धा आपल्या अर्थशास्त्रीय लिखाणाची सुरुवातच "प्रोटक्शन टू ॲग्रीकल्चर" ही शेतीचे महत्त्व सांगणारी पुस्तिका लिहून केली.

राष्ट्रवादी अर्थतज्ज्ञ फ्रेडरिक लिस्ट यांनी आर्थिक विकासाच्या अवस्था किंवा टप्पे सांगून असे स्पष्ट केले की, प्रत्येक मागासलेल्या राष्ट्रांना विकसित होताना या पाच टप्प्यामधून जावे लागते. त्यात त्यांनी रानटी किंवा शिकारी अवस्था, पशुपालन अवस्था, शेतकी अवस्था, शेती-उद्योग अवस्था, शेती-उद्योग-व्यापार अवस्था असे वर्गीकरण केले आहे. यावरुन असे लक्षात येते की, विकासाच्या सुरुवातीच्या अवस्थेपासून शेवटच्या अवस्थेपर्यंत शेती क्षेत्र महत्त्वाचे आहे. त्याशिवाय राष्ट्राचा परिपूर्ण विकास होऊ शकत नाही ही गोष्ट लक्षात येते.

इ.स. पूर्व चवथ्या शतकामध्ये कौटील्य उर्फ विष्णूगुप्त चाणक्य यांनी लिहिलेल्या 'अर्थशास्त्र' नावाच्या ग्रंथामध्ये शेती विषयक विचाराला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. त्याकाळी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी 'वार्ता' हा शब्दप्रयोग केला जात होता. त्यामध्ये प्रामुख्याने शेती, पशुसंवर्धन आणि व्यापाराचा अभ्यास होता. शेतकी खात्यासाठी नेमलेल्या अधिका·यास 'सीताध्यक्ष' म्हटले जात असे, त्याकाळी शेतीला सर्वोच्च स्थान होते. कारण अनेक प्रकारच्या संपत्तीची जननी म्हणजे शेती होय."

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीही 'स्मॉल होल्डींग्ज इन इंडिया ॲन्ड देअर रेमीडीज' या संशोधन लेखाच्या माध्यमातून शेतीचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. ते म्हणतात की, "भारताच्या दृष्टीने शेती हा एक महान राष्ट्रीय उद्योग आहे. सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्त्व सर्वाधिक आहे. अशा या शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणजे धारणक्षेत्राचा आकार होय."

वरील प्रकारची विविध मत मतांतरे पाहता थोडक्यात असे म्हणता येते की कोणत्याही देशात शेतीचे महत्त्व कायम आहे हे पुढील प्रमाणे केलेल्या विश्लेषणाच्या आधारे अधिक स्पष्टपणे सांगता येईल.

अन्न ही मानवाची मुलभूत गरज आहे. माणसाला जगण्यासाठी अन्न धान्याची गरज आहे, आणि ते अन्नधान्य पुरवण्याचे कार्य शेती आणि शेतकरी करीत असतो. जास्त लोकसंख्या असणा·या भारतासारख्या देशामध्ये अन्नधान्याची वाढती मागणी लक्षात घेता शेतीचे महत्त्व अधिक लक्षात येते. भारतामध्ये 1950-51 ते 2019-20 या कालावधीत अन्न धान्याचे उत्पादन 50.80 दशलक्ष टनावरुन 455.88 दशलक्ष टन इतके वाढलेले आहे.

जगातील प्रत्येक देशाच्या औद्योगिकरणाचा मुख्य आधार म्हणून शेतीकडे पाहिले जाते. महत्त्वाच्या राष्ट्रीय उद्योगांना लागणारा कच्चा माल शेती मधूनच पुरवला जातो. उदा. कापड उद्योग, साखर उद्योग, खाद्यतेल उद्योग, दुग्ध प्रक्रिया उद्योग इत्यादी बरोबरच इतरही अनेक उद्योग असे आहेत की, जे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहेत. उद्योगाला कच्चा माल पुरवण्याबरोबरच अनेक प्रकारच्या औद्योगिक वस्तूंचा मुख्य खरेदीदार म्हणून शेतीकडे पाहिले जाते. उदा. रासायनिक खत उद्योग, किटकनाशके निर्मिती उद्योग, कृषी यंत्रे उत्पादन करणारे उद्योग इत्यादी प्रा.ऑर्थर लेवीस यांच्या अमर्याद श्रम पुरवठयाच्या सिद्धांतानुसार औद्योगिक क्षेत्राला लागणारे मनुष्यबळ ही मोठया प्रमाणावर शेतीतूनच पुरवता येते.

भांडवल निर्मिती मध्येही शेतीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरते. ज्ञानेश्वरी मधील 18 व्या अध्यायात 880 क्रमांकाची ओवी भांडवल निर्मितीचा सिद्धांत मांडते. "भूमी, बीज नांगर याच भांडवलाचा आधार" 'भांडवल निर्मिती जमिनीत होते, कारण तेथेच गुणाकार होतो. ज्या जमिनीत ही भांडवल निर्मिती शेतकरी करतो तेथेच भांडवलाचा अभाव का ? हा चमत्कार कसा घडतो ? याची फोड कोणी करीत नाही अगर केली नाही'

यावरुन असे लक्षात येते की भांडवल निर्मिती शेतीत होते; परंतु शेतीतच भांडवलाची मोठी कमतरता दिसून येते, ही भारतीय अर्थव्यवस्थेची वस्तुस्थिती आहे. जपानमध्ये मात्र याच्या उलट चित्र दिसून येते. कारण जपानमध्ये विकासाच्या सुरुवातीच्या काळात शेतीमधील अधिक्याचा वापर भांडवल निर्मितीसाठी प्रभावीपणे करण्यात आला. 19 व्या शतकाच्या शेवटी जपानमध्ये लोकसंख्येचा ताण होता, शेती तुकडयामध्ये विखुरलेली होती, शेतजमीन लागवडीच्या क्षेत्राचा 3 एकर पेक्षा कमी होता. तरीही लागवडीखालील क्षेत्रात केवळ 21 टक्के वाढ करुन जपानने शेती उत्पादनात 77 टक्के इतकी प्रचंड वाढ केली.

मा. वसंतराव नाईक साहेब नेहमी म्हणत असत की, "शेतकरी सुखी तर जग सुखी, कारण शेतक·यांच्या उर्जीत अवस्थेवरच आपली उर्जीत अवस्था अवलंबून आहे. विजेचा मोठा ग्राहक शेतकरी, बसचा प्रवासी तोच, इंजीनचा व पंपाचा ग्राहक, असे सगळे कृषिप्रधान देशाचे अर्थशास्त्रच मुळी त्यांच्यावर आवलंबून आहे. शेतक·याला त्याच्या मालाला योग्य भाव मिळाल्याने मध्यम वर्गाला तात्पुरती महागाई वाढली असे वाटले तरी ते खरे नाही. ख·या अर्थाने स्वस्ताई म्हणजे दारिद्रय, महागाई म्हणजे दुर्बलतेचे लक्षण ! अर्थात काळाबाजार, साठेबाजी, लबाडीने केलेली कृत्रिम महागाई नव्हे".

जागतिक व्यापाराच्या दृष्टीने विचार करता शेतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे, स्वातंत्र्यपूर्व कालखंडाचा विचार करता, दुस·या जागतिक महायुद्धाच्या कालखंडात सन 1938-39 साली 17 कोटी रु. 1945-86 साली 21 कोटी रु. तर 1946-47 साली 31 कोटी रु. इतके व्यापार अधिक्य निर्माण झाले होते. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र ही स्थिती खालावली, हा फाळणीचा परिणाम म्हणावा लागेल, परंतु त्या नंतरच्या कालखंडात मात्र विदेशी व्यापारात उत्तरोत्तर वाढ झाली. कृषी व संबंधीत वस्तूंच्या निर्यातीमध्ये चहा, कॉफी, तंबाखू, गरम मसाले, भात, साखर, कापूस, ज्युट, काजू, अन्नधान्य, मासे, मटन, भाजीपाला व फळे आणि फुले इत्यादी वस्तूंचा समावेश होतो.

कृषी व संबंधीत वस्तूंची एकूण निर्यात विचारात घेता सन 2014-15 मध्ये 239681.47 करोड रु. सन 2015-16 मध्ये 215395.68 करोड रु. इतकी होती. एकूण राष्ट्रीय निर्यातीशी तुलना करता हे प्रमाण सन 2014-15 मध्ये 12.64 टक्के तर 2015-16 मध्ये 12.55 टक्के इतके होते.

औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत उद्योगाला लागणारा श्रमपुरवठा शेतीतूनच उपलब्ध होतो. कारण शेतीमध्ये खुल्या बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे शेती क्षेत्राच्या विकासाबरोबर शेतीमध्ये तंत्रज्ञानाच्या वापरात वाढ होत जाते. त्यामुळे शेतीमध्ये उत्पादन घेण्यासाठी कमी श्रमिकांची गरज भासते. परिणामी शेतीतील श्रमिकांचा एक मोठा वर्ग उद्योगामध्ये काम करण्यासाठी उपलब्ध होतो. त्यामुळे उद्योगाची श्रम पुरवठयाची गरज भागवली जाते.

रोजगार निर्मितीच्या दृष्टीने विचार करता आजही देशातील विशेषत: विकसनशील व अल्प विकसित देशातील लोकांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देणारे क्षेत्र म्हणून शेतीकडे पाहिले जाते. अशा देशामध्ये लोकसंख्या वाढीच्या तुलनेत औद्योगिक क्षेत्रामध्ये नोक·या निर्माण होत नाहीत. कारण उद्योग आणि सेवा क्षेत्रामध्ये रोजगार निर्मितीसाठी जास्त भांडवलाची गरज असते, विकसनशील देशांकडे भांडवलाचा तुटवडा असतो. तुलनेने शेतीमध्ये रोजगार वृद्धी करण्यासाठी जास्त भांडवलाची गरज नसते. म्हणून अशा देशामध्ये बहुसंख्य लोकांना शेतीवर अवलंबून राहवे लागते किंवा शेती आधारित उद्योगांवर अवलंबून रहावे लागते.

सरकारी महसूल व आर्थिक नियोजनामध्ये ही शेतीचा वाटा मोठा असतो. शेती हा राज्य सरकारच्या अखत्यारितील विषय असला तरी केंद्र सरकार शेती उत्पादनावर निर्यात कराच्या माध्यमातून महसूल गोळा करते, तर राज्य सरकार सुद्धा जमीन महसूल, कृषी उत्पन्न कर, सिंचन व सुविधांवरील कर इत्यादी च्या माध्यमातून महसूल गोळा करीत असते. तसेच देशाच्या आर्थिक नियोजनात कृषीक्षेत्र अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असते.

भारतासारख्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थांचा विचार करता वृद्धी दर हा कृषी क्षेत्राच्या वृद्धीदरावर अवलंबून असतो. जसे भारतीय अर्थव्यवस्थेत ज्या काळात शेती क्षेत्राचा वृद्धी दर 1 टक्क्या पेक्षा कमी राहिला त्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर ही 5 ते 6 टक्क्यांपेक्षा कमी होता. यावरुन एक गोष्ट लक्षात येते की, शेती आणि शेतीवर आधारीत उद्योगांच्या विकासाशिवाय भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर वाढू शकत नाही.

अशाप्रकारे कोणत्याही देशात शेतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसू येते मग ती अर्थव्यवस्था विकसीत, विकसनशील किंवा अल्पविकसित असो, भारत हा तर मूळातच कृषीप्रधान अर्थव्यवस्था असणारा देश आहे. ख·या अर्थाने देशाचा विकास करायचा असेल तर अगोदर शेतीकडे लक्ष दिले पाहिजे.

तेव्हा शेतजमिनी बाबतीत असणारी ही विषमता दूर करावी लागेल. दुष्काळ सदृष्य परिस्थितीत कर्जावरील व्याज आणि कर्ज माफ करावे. संपूर्ण कुटुंब, पशुधन व पिकांना विमा संरक्षण द्यावे, आरोग्य विमा, वृद्धांना पेन्शन, सामाजिक सुरक्षा, कमी जोखमीच्या शेती तंत्रज्ञानाचा विकास, हवामान तंत्रज्ञानाचा विकास, शेती शिक्षण, ज्ञान केंद्राची स्थापना, पारंपरिक बियाण्यांचे संवर्धन करावे लागेल. अशा अत्यंत महत्त्वपूर्ण शिफारशी स्वामीनाथन आयोगाने सूचविल्या आहेत. त्या शिफारशींची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

संशोधन विषयाची निवड :-

आज भारतीय शेतीसमोर अनेक समस्या आहेत. शेतीचे मान्सून वरील अवलंबित्व, कृषीमध्ये गुंतवणूकीची कमतरता, जलसिंचन सुविधांचा अभाव, पुरेसा व सवलतीच्या दरातील कर्ज पुरवठयाचा अभाव, योग्य माहितीचा अभाव, शेतमालाला योग्य दर न मिळण्याची समस्या, योग्य कृषी धोरणांचा अभाव, योग्य योजना व योजनांच्या योग्य अंमलबजावणीची समस्या इत्यादी समस्यांच्या गर्तेत भारतीय शेती आणि शेतकरी अडकलेला आहे. देशातील 65 टक्के लोकसंख्या आजही खेडयामध्ये राहते, गावामध्ये राहणा·या माणसांचा जोपर्यंत विकास होत नाही

तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही. गावामध्ये राहणारी बहुसंख्य जनता ही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या शेतीशी संबंधीत आहे. भारतीय शेतक·यांना समृद्ध करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या वतीने अनेक कल्याणकारी योजना राबवल्या जातात, परंतु त्यांचा कितपत लाभ शेतक·यांना होतो हा ही एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे.

कायमच या वर्गाची शासन व प्रशासन स्तरावरुन उपेक्षा झालेली आहे. परिणामी या वर्गाच्या हालाखीत वाढ झालेली आहे. म्हणून अशा अपेक्षित वंचित अल्प भूधारक शेतक·यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीचा अभ्यास करुन उपाययोजना सुचवाव्यात या हेतूने "कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतक·यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

"देशातील 40 टक्के शेतकरी पर्याय उपलब्ध झाल्यास शेती सोडून देण्यास तयार आहेत."

सकाळ वृत्तसमूहाने केलेल्या अभ्यासावरुन आत्महत्या केलेल्या शेतक·यांमध्ये 56 टक्के शेतकरी अल्प भूधारक, 34 टक्के शेतकरी मध्यम भूधारक, तर फक्त 10 टक्के शेतकरी मोठे आहेत. आत्महत्त्येच्या कारणांमध्ये नापिकी, कर्जबाजारीपणा, पुरेशा व स्वस्त कर्ज पुरवठयाचा अभाव, खाजगी सावकाराकडून भरमसाठ व्याज आकारणी, शेतमाल किंमतीतील चढउतार, अपु·या सिंचन सुविधा, वाढता उत्पादन खर्च, अयोग्य कृषी धोरण, इत्यादी कारणांचा समावेश होतो. अशा परिस्थितीतून शेतकरी जात असताना शेतक·यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे ठरते.

राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा घटत असला तरी, प्रचंड मोठया लोकसंख्येची अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यामध्ये शेतक·यांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. देशातील अनेक उद्योगांना कच्चा माल शेतीतूनच पुरवला जातो, ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे कार्यही शेतीतूनच पार पाडले जाते. कोल्हापूर जिल्हा हा सधन जिल्हा म्हणून ओळखला

जात असला तरी, जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकरी मात्र फारसा सधन दिसत नाही. त्याची आर्थिक परिस्थिती केवळ बेताचीच आहे असे नाही तर पूर्णपणे खालावलेली आहे. अशावेळी अल्पभूधारक शेतक·यांचा अभाव होणे गरजेचे होते; परंतु जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतक·यांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास झालेला नाही. या उलट शेतीवर अवलंबून असणारा शेतमजूर, विडी कामगार, औद्योगिक कामगार, विविध जाती जमाती इत्यादी वर्गाच्या सामाजिक आर्थिक स्थितीचा अभ्यास झालेला आहे. शेतकरी मात्र अभ्यासकांच्या अभ्यासापासून दुर्लक्षित राहिलेला आहे. अपेक्षित, वंचित राहिलेल्या बहुसंख्य अल्प भूधारक शेतक·यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने "कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतक·यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास" हा विषय अत्यंत महत्त्वाचा आणि गरजेचा आहे, कारण शेतकरी जगला तरच देश जगला तरच देश जगणार आहे.

संशोधन समस्येचे निवेदन :-

अल्प भूधारक व किरकोळ शेतकरी शेतीत्पादनाच्या अव्यवहार्य अर्थव्यवस्थेच्या जाळयात सापडला आहे. हे अर्थव्यवस्थेचे जाळे जमिनीचे छोटे आकारमान, पाण्याची उपलब्धता, यांत्रिकीकरणामुळे वाढलेल्या उत्पादनाचा खर्च, बडया शेतक·यांच्या तुलनेत साधन सामग्रीची वानवा आणि प्रतिकूल बाजारपेठेची व्यवस्था यामुळे निर्माण झाले आहे."

अशा अल्पभूधारक शेतक·यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तशीच त्यांच्या समस्यामध्येही वाढ होत आहे. अल्पभूधारक शेतक·यांसाठी दीर्घकालीन कृषी धोरणाचा अभाव आहे. शेतक·यांचा अशिक्षितपणा, पर्यायी रोजगार संधीचा अभाव, शासकीय व प्रशासकीय यंत्रणेकडून होणारी अडवणूक, वाढत जाणा·या कृषी आवश्यक साहित्यांच्या किंमती, उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतक·यांच्या शेतमालाला मिळणारी अल्प किंमत, वाढत जाणारा कर्जबाजारीपणा अशा प्रकारच्या आर्थिक दुष्टचक्रात अल्पभूधारक शेतकरी अडकलेला आहे.

सुप्रसिद्ध पत्रकार पी.साईनाथ महाराष्ट्राचे वर्णन करताना म्हणतात की, "महाराष्ट्र ही शेतक·यांची स्मशानभूमी आहे."

विदर्भ मराठवाडयातील कापूस व अन्नधान्य उत्पादन शेतकरी आत्महत्येच्या जात्यात आहे, तर पश्चिम महाराष्ट्रासह कोल्हापूर जिल्ह्यातील अल्प भूधारक शेतकरी आत्महत्तेच्या सुपात आहे तो जात्यात पडणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. म्हणूनच त्याच्या सामाजिक आर्थिक स्थितीचा अभ्यास करुन योग्य उपाययोजनांची अंमलबजावणी करुन त्याच्या समोरील समस्यांची सोडवणूक करणे अत्यंत आवश्यक आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :-

1. शेती आणि शेतकरी या विषयाचा सखोल अभ्यास करणे.
2. कोल्हापूर जिल्ह्याच्या भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक-आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक पाश्र्वभूमीचा अभ्यास करणे.
3. अल्पभूधारक शेतक·यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास करणे.
4. अल्पभूधारक शेतक·यांसाठीची शासकीय स्तरावरील धोरणे व योजनांचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहितके :-

1. अल्पभूधारक शेतक·यांची सामाजिक-आर्थिक स्थिती दयनीय असून तो हालाखीचे जीवन जगत आहे.
2. अल्पभूधारक शेतक·यांची सामाजिक-आर्थिक स्थिती दयनीय होण्याला शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व, शासकीय धोरण व योजनांची सदोष अंमलबजावणी, शेतक·यांचे अज्ञान या गोष्टी जबाबदार आहेत.

3. अल्पभूधारक शेतकरी प्रयत्नवादी आहे. निसर्गावरील अवलंबीत्व कमी करुन शासकीय स्तरावर शेती विकासाचा दीर्घकालीन आराखडा तयार करुन, योजनांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली तर अल्पभूधारक शेतक·यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत सुधारणा होऊ शकते.

संशोधन पद्धती :-

1 संशोधन अध्ययनाचे क्षेत्र :-

महाराष्ट्र राज्यातील "कोल्हापूर" हा जिल्हा संशोधन अध्ययनाचे क्षेत्र म्हणून निवडण्यात आलेला आहे. जिल्ह्यातील 5 एकर व त्यापेक्षा कमी शेतजमीन नावे असणा·या व प्रत्यक्ष शेती कसणा·या अल्प भूधारक शेतक·यांचा समावेश संशोधनाच्या अध्ययनासाठी करण्यात येणार आहे. अध्ययन करण्यासाठी जिल्ह्यातील करवीर, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, गडहिंग्लज, चंदगड, आजरा, भुदरगड, राधानगरी, गगणबावडा व शाहूवाडी या बारा तालुक्यातून प्रशासकीय विभागनिहाय एकूण 1200 गावांपौकी 10 टक्के नमुना निवड करुन 120 गावातील प्रत्येकी 5 अल्पभूधारक शेतक·यांच्या म्हणजेच एकूण 600 अल्पभूधारक शेतक·यांच्या मुलाखत अनुसूचीच्या आधारे मुलाखती घेऊन अभ्यास करण्यात येणार आहे.

2 संशोधन विषय :-

संशोधनासाठी "कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतक·यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास" हा विषय निवडण्यात आलेला आहे. सदर विषयाच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्याची तोंड ओळख, अल्पभूधारक शेतक·यांची सामाजिक आर्थिक स्थिती, शासकीय धोरणे व योजनांचा चिकित्सक अभ्यास करुन उपाय योजना सूचविण्यात आलेल्या आहेत.

3 तथ्य संकलन :-

सामाजिक संशोधनामध्ये तथ्य संकलनास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. संशोधन विषयाचे निष्कर्ष सर्वमान्य होण्यासाठी व त्यात वस्तुनिष्ठता येण्यासाठी तथ्यांचा आधार घेणे आवश्यक असते. संशोधकाने संकलित केलेल्या तथ्यांच्या अचुकतेवरच संशोधन निष्कर्षाची अचुकता व विश्वसनियता अवलंबून असते. म्हणूनच संशोधकाने नेहमी अचुकपणे तथ्याचे संकलन करण्यास प्राधान्य दिले पाहिजे.

3 अ तथ्यांचा अर्थ व व्याख्या :-

'तथ्य' या मराठी शब्दाला इंग्रजीमध्ये फॅक्ट असे म्हणतात. ज्ञानेद्रिये हाच तथ्य प्राप्तीचा खरा आधार आहे. म्हणून ज्ञानेंद्रियाच्या आधारे होणारा स्थितीबोध किंवा निरीक्षण म्हणजे तथ्य होय. जसे आहे तसे पाहणे' म्हणजेच तथ्य होय."

पॉलिन यंग च्या मते, "केवळ मूर्त वस्तु वा घटनांनाच तथ्य म्हणता येणार नाही. सामाजिक शास्त्रात विचार, अनुभव आणि भावना देखील तथ्य आहेत. तथ्यांना अशा भौतिक अथवा शारीरिक, मानसिक व भावनात्मक घटनांच्या स्वरुपात पाहिले पाहिजे की, ज्याची खात्रीपूर्वक पुष्टी केली जावू शकते आणि ज्यांचा भाष्याच्या विश्वात सत्य म्हणून स्वीकार केला जातो."

गुड आणि हॅटच्या मते, "एक अनुभवसिद्ध सत्यापनीय अवलोकन म्हणजे तथ्य होय"

दुर्खाइमच्या मते, "सामाजिक तथ्य व्यवहाराचा (विचार, अनुभव किंवा क्रिया) असा पक्ष आहे की, ज्याचे निरीक्षण वस्तुनिष्ठ स्वरुपात शक्य आहे आणि जे एका विशिष्ट तऱ्हेने व्यवहार करण्यात बाध्य करते."

फेअर चाइल्डच्या मते "तथ्य ही एक अशी घटना आहे की, जिच्या निरीक्षण आणि मापनाच्या तंत्रामध्ये अधिक प्रमाणात सहमती आढळून येते."

ब तथ्य संकलनाचा अर्थ व व्याख्या :

सामाजिक संशोधनामध्ये अज्ञात असलेल्या समस्येची ओळख करुन घेण्यासाठी तथ्य संकलनाशिवाय पर्याय नाही. तथ्य संकलनाला सामग्रीचे संकलन किंवा माहितीचे संकलन करणे असेही संबोधले जाते. म्हणूनच तथ्य संकलन म्हणजेच "संशोधन विषयासाठी आवश्यक असलेली अनुभवजन्य व प्रचितीक्षम माहिती व आकडेवारी जमा करणे म्हणजे तथ्य संकलन होय."

4 तथ्य संकलनाच्या पद्धती :

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनास किती महत्त्व आहे या संदर्भात असे म्हणता येईल की, संशोधनाची सुरुवात आणि संशोधनाचा शेवट सुद्धा तथ्याचा आधार घेऊनच करावा लागतो. तथ्य संकलनाच्या स्रोतांच्या प्रकारानुसार तथ्य संकलनाच्या दोन पद्धती अस्तित्वात आलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

अ. प्राथमिक तथ्य सामग्री :

प्राथमिक तथ्य सामग्री म्हणजे जेव्हां संशोधक आपल्या संशोधन कार्यासाठी हवी असणारी माहिती स्वत: मिळवत असतो, तेव्हा अशा प्रकारच्या माहितीस प्राथमिक तथ्य सामग्री असे म्हणतात. अशी माहिती गोळा करण्यासाठी संशोधक स्वत: घटनास्थळावर किंवा संशोधन क्षेत्रात जाऊन संशोधन समस्येशी संबंधीत जिवंत व्यक्तीकडून माहिती संकलीत करीत असतो. ही माहिती गोळा करण्यासाठी संशोधक प्रत्यक्ष निरीक्षण, अनुसूची, प्रश्नावली, मुलाखत इत्यादी माध्यमाचा वापर करतो.

श्रीमती पॉलीन यंग यांच्या मते, प्राथमिक स्रोतांचे वर्गीकरण प्रत्यक्ष स्रोत आणि अप्रत्यक्ष स्रोत अशा दोन भागात केले जाते. प्रत्यक्ष स्रोतांमध्ये प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखती, अनुसूचीचा समावेश होतो. तर अप्रत्यक्ष स्रोतामध्ये प्रश्नावली, दूरध्वनी मुलाखत, रेडिओ व टी.व्ही. वरील आवाहन, पॅनेल तंत्र इत्यादी चा समावेश होतो. तर अलिकडील काळात सोशल मिडीयाचा वापर करुन ही अप्रत्यक्ष माहिती गोळा करता येते व तिचा संशोधन कार्यासाठी वापर करता येवू शकतो.

ब दुय्यम तथ्य सामग्री :-

दुय्यम तथ्य सामग्री म्हणजे जेव्हा संशोधक आपल्या संशोधन कार्यासाठी हवी असणारी माहिती इतरांनी संकलित केलेल्या माहितीवरुन गोळा करतो, तेव्हा अशा प्रकारच्या माहितीस दुय्यम तथ्य सामग्री असे म्हणतात. अशी माहिती इतर व्यक्ती व संस्थांनी यापूर्वीच संकलित केलेली असते आणि जी लिखित स्वरुपात असते. अशा प्रकारच्या माहितीचा उपयोग संशोधकास प्राथमिक स्वरुपाच्या माहितीची वस्तुनिष्ठता तपासून पाहण्यासाठी होत असतो.

दुय्यम तथ्य सामग्रीचे वर्गीकरण दोन भागामध्ये केले जाते. पहिल्या भाग म्हणजे व्यक्तीगत कागदपत्रे किंवा व्यक्तीगत प्रलेख होय. ज्यात आत्मचरित्र किंवा जिवनचरित्र, रोजनिशी किंवा दैनंदिनी, पत्रे, संस्मरणे व आठवणी इत्यादी चा समावेश होतो. तर दुसरा भाग म्हणजे सार्वजनिक कागदपत्रे किंवा सार्वजनिक प्रलेख होय ज्याचे वर्गीकरण दोन उपप्रकारात केले जाते. त्यापौकी पहिला उपप्रकार म्हणजे प्रकाशित सार्वजनिक प्रलेख होय ज्यात अभिलेख, प्रकाशित आकडेवारी, खाजगी संस्थांचे अहवाल, आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनांचे अहवाल, शौक्षणिक व संशोधन संस्थांची प्रकाशने, वाणिज्य व व्यावसायिक संस्थांची प्रकाशने, नियतकालिके, वर्तमानपत्रे साप्ताहिके इत्यादी.

याशिवाय अन्य विविध सामग्रीमध्ये कथा, सार्वजनिक कागदपत्रे किंवा सार्वजनिक प्रलेख याचा दुसरा उपप्रकार म्हणजे अप्रकाशित सार्वजनिक कागदपत्रे किंवा अप्रकाशित सार्वजनिक प्रलेख होय ज्यात गोपीनय अभिलेख, दुर्मिळ हस्तलिखिते, संशोधन अहवाल इत्यादीचा समावेश होतो.

तथ्य संकलनासाठी वापरण्यात येणारी साधन सामग्री :-

"कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतक·यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास" या संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन करण्यासाठी प्राथमिक तथ्य सामग्री आणि दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात येणार आहे.

प्राथमिक तथ्य सामग्रीमध्ये मुलाखत व अनुसूची तयार येणार आहे. या मुलाखत व अनुसूचीच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतक·यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मुलाखत घेण्यात येणार आहे.

प्राथमिक तथ्य संकलनाबरोबरच दुय्यम स्वरुपाच्या साधन सामग्रीचाही आधार घेण्यात येणार आहे. यामध्ये कोल्हापूर जिल्हा ग्ॉझेटीयर, कोल्हापूर जिल्हा सामाजिक-आर्थिक समालोचन, देशाची व राज्याची आर्थिक पाहणी अहवाल, विविध शासकीय, निमशासकीय, खाजगी अहवाल व प्रकाशने, संकेत स्थळे, संशोधन अहवाल, संदर्भग्रंथ, संशोधनात्मक लेख, कादंबरी, मासिके, नियतकालिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे इत्यादी स्वरुपाच्या दुय्यम साधनांचा वापर करुन माहिती संकलित करण्यात येणार आहे.

तथ्य विश्लेषण व सारणीकरण :-

सामाजिक संशोधनामध्ये तथ्य संकलनाला जेवढे महत्त्व आहे, तेवढेच महत्त्व तथ्य विश्लेषणाला सुद्धा आहे. तथ्य विश्लेषण करण्यासाठी तथ्यांची सुत्रबद्ध पद्धतीने मांडणी करणे अत्यंत आवश्यक असते की, ज्याद्वारे संशोधकाला संशोधनाचे निष्कर्ष काढणे सोपे होते. संशोधकाने केवळ माहितीचे संकलन केले म्हणजे संशोधन पूर्ण होत नाही. संशोधनाला परिपूर्णत्वाकडे घेऊन जाण्यासाठी तथ्य विश्लेषण करणे अत्यंत आवश्यक असते. तथ्य संकलनामुळे संशोधकास माहितीतील उणीवा लक्षात येतात. त्यामुळे अशा उणीवा दूर करण्यासाठी तथ्य विश्लेषण उपयोगी ठरते.

संशोधक जोपर्यंत तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करीत नाही, तोपर्यंत अशी तथ्ये कच्चा स्वरुपात व अर्थहीन असतात. विश्लेषणानंतर मात्र अशा तथ्यांना एक वेगळाच अर्थ प्राप्त होतो. या संदर्भात जुल्स हेत्सी पोईनकर म्हणतात की, "ज्या प्रमाणे दगडाच्या सहाय्याने घर तयार होते. त्याचप्रमाणे तथ्यांमुळे विज्ञान उभे राहते. पण ज्याप्रमाणे दगडांचा ढिग म्हणजे घर नव्हे त्याचप्रमाणे केवळ तथ्य संकलन म्हणजे विज्ञान नव्हे."

संशोधनातील तथ्य संकलनाचे महत्त्व लक्षात घेऊन तथ्य प्रक्रियनाच्या पूर्वतयारीतील तथ्यांचे संपादन, द्वितीय तथ्यांचे परिक्षण, तथ्यांचे वर्गीकरण, संकेतीकरण, तथ्यांचे सारणीकरण व प्रथ:करण या पाय·यांचा आधार येणार आहे. तसेच संशोधनाचा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन संशोधन समस्या व मिळलेल्या परिणामाची गृहीतकांशी पडताळणी करण्यासाठी संकलित माहितीच्या आधारे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. आवश्यक तेथे आलेख, आकृत्या व नकाशांचा वापर केला जाणार आहे. शक्य तेथे सारणीकरण स्वरुपात मांडणी केली जाणार असून निष्कर्षांची गृहीतकांशी पडताळणी केलेली आहे.

संशोधन कालावधी :-

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाचा कालखंड हा सन 1994-95 ते 2014-15 असा 20 वर्षातील आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतक·यांच्या सामाजिक, आर्थिक चिकित्सक पद्धतीने अभ्यास करण्यात येणार आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा :

बी.आर. आंबेडकर (1918) :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक दर्जाचे समाजशास्त्रज्ञ आणि अर्थतज्ज्ञ आहेत. त्यांनी लिहिलेला "स्मॉल होल्डींग इन इंडिया अॅन्ड देयर रेमीडीज" हा शोधनिबंध सन 1918 साली जर्नल ऑफ इंडीयन इकॉनॉमीक सोसायटीमध्ये प्रसिद्ध झाला. आपल्या शोध निबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील अल्पभूधारणा क्षेत्राच्या समस्यांची चर्चा करुन उपाय योजना सूचवल्या आहेत. यामध्ये ते म्हणतात की, लहान धारण क्षेत्र ही भारतीय शेतीला भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. तसेच ही लहान धारणक्षेत्र विखुरलेली असल्याने ती समस्या अधिक बिकट होते. याची कांही उदाहरणे देऊन त्यांनी ही समस्या अधिक स्पष्ट केली आहे. पुण्याशेजारच्या पिपाला सौदागर यांचे अवघे दोन एकर एवढेच धारणक्षेत्र होते. रत्नागिरी जिल्ह्यातील अवघ्या वीस गुंठयाचे धारणक्षेत्र तीन तुकडयात विभागलेले होते. ठाणे जिल्ह्यातील एक एकर नऊ गुंठयाचे

धारणक्षेत्र सहा तुकडयात विभागले होते. तर सुरत मधील एक एकरचे धारणक्षेत्र चौदा तुकडयाचे मिळून झालेले होते. आपल्या अभ्यासामध्ये बाबासाहेब आंबेडकर अत्यंत महत्त्वाचे तीन प्रश्न उपस्थित करतात.

1) धारणक्षेत्राच्या विखंडनामुळे साधनसंपत्तीचा उपयोग कार्यक्षमपणे करण्यात अडचण निर्माण होत असतानाही असे विंखडन मूळातच का होते?

2) मोठी धारणक्षेत्रे कार्यदक्ष व लहान धारणक्षेत्रे अकार्यक्षम ही वस्तूस्थिती खरोखरच आहे का? दुस·या शब्दात असे म्हणता येईल की, 'किफायतशीर' (इकॉनॉमिक) धारणक्षेत्र कसे ठरवायचे?

3) भारतातील लहान व विखुरलेल्या धारण क्षेत्रामुळे निर्माण झालेल्या समस्येवरील अंतीम उपाय कोणता?

प्रणव भट्टाचार्य (1976) :

प्रणव भट्टाचार्य यांनी सन 1976 मध्ये 'द स्मॉल फार्मर्स ऑफ पंजाब' हा लघुशोधप्रबंध दिल्ली विद्यापीठास सादर केला. आपल्या संशोधनामध्ये त्यांनी पंजाबमधील 156 शेतक·यांचे 1972-73 मध्ये सर्वेक्षण करुन अल्प भूधारक शेतकरी आणि मोठया शेतक·यांचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. आपल्या अभ्यासातून त्यांनी असे निष्कर्ष काढले आहे की, अल्प भूधारक शेतक·यांच्या तुलनेत पंजाबमधील मोठया शेतक·यांना हरीत क्रांतीचे फायदे झालेले आहेत. मोठया शेतक·यांच्या तुलनेत अल्प भूधारक शेतक·यांकडे अत्यंत कमी साधने उपलब्ध असल्यामुळे, त्यांच्या उत्पादन वाढीवर मर्यादा येतात. अल्प भूधारक शेतकरी दोन तृतीयांश अन्नधान्याचे तर फक्त एक तृतीयांश व्यापारी पिकांचे उत्पादन घेतात. मोठया शेतक·यांच्या तुलनेत ते हालाखीचे जीवन जगतात. कष्ट करण्याची इच्छा व तयारी असून सुद्धा आर्थिक व प्रशासकीय अडचणींमुळे त्यांच्या विकासावर मर्यादा येतात. यातून मार्ग काढण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन करावे. प्रशिक्षण द्यावे, पतपुरवठा वाढवून मिळावा.

सुरेंद्र प्रसाद सिन्हा (1978) :

सुरेंद्रप्रसाद सिन्हा यांनी सन 1978 मध्ये "मार्जीनल ॲन्ड स्मॉल फार्मर्स - परस्पेक्टीव्ह, प्रॉब्लेम्स ॲन्ड प्रास्पेक्टस्" या संशोधनामध्ये बिहारमधील अल्पभूधारक व सिमांत शेतक·यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास केला. या करीता त्यांनी 1972-73 मध्ये दरभंगा जिल्ह्यातील 17 गावांची निवड करुन, 165 शेतक·यांचा अभ्यास केला व असे निष्कर्ष काढले की, मागासवर्गीय जातींमध्ये सिमांत व अल्पभूधारक शेतक·यांची संख्या जास्त आहे. 38.8 टक्के सिमांत व अल्पभूधारक शेतकरी साक्षर आहेत. जमीन धारणेनुसार उत्पन्नात वाढ झालेली असली तरी त्यांच्याकडे फक्त उदरनिर्वाह चालेल एवढीच संपत्ती आहे. तीन चतुर्थांश शेतकरी कर्जबाजारी आहेत.

व्ही.आर.कोलते (1989) :

व्ही.आर.कोलते यांनी सन 1989 मध्ये "डेव्हलपमेंट ऑफ स्मॉल ॲन्ड मार्जीनल फार्मर्स" या ग्रंथात विदर्भातील शेतक·यांचा अभ्यास केलेला आहे. अभ्यासाकरीता त्यांनी नागपूर जिल्ह्यातील 8 गावातून 225 अल्प भूधारक व सिमांत शेतक·यांचे सर्वेक्षण करुन माहिती गोळा केली, यामध्ये असे निष्कर्ष काढले की, सिमांत व अल्पभूधारक शेतक·यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण 50 टक्के पेक्षा कमी आहे. आधुनिक शेती तंत्रज्ञान वापराबाबत त्यांच्यामध्ये उदासीनता असून अशा शेतक·यांना योग्य प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

दवे व्ही. जे. (1994) :

दवे व्ही.जे. यांनी सन 1994 मध्ये "इॅकॉनामीक व्हायबिलीटी ऑफ स्मॉल ॲन्ड मार्जीनल फार्मस इन रेनफेड ॲग्रीकल्चर : केस स्टडी ऑफ भावनगर डिस्ट्रीक्ट इन गुजरात" या संशोधनामध्ये भावनगर जिल्ह्यातील सावरकुंडला तालुक्यातील 100 अल्प भूधारक व सिमांत शेतक·यांचा अभ्यास केला. अभ्यासामध्ये त्यांना असे निदर्शनास आले की, अल्पभूधारक व सिमांत शेतक·यांची शेती मान्सूनवर अवलंबून असल्यामुळे ते वर्षातून फक्त एकच पीक घेतात.

ए. पी. जे. अब्दुल कलाम, वाय.एस.राजन (2004) :

यांनी आपल्या व्हीजन 2020 या ग्रंथामध्ये अशी मांडणी केली आहे की, भारतीय शेतकरी हा कमालीचा कष्टाळू आणि उद्यमशील आहे, पावसावर अवलंबून असणा·या शेतक·यांचे कष्ट आणि हाल अपेष्टा जास्त आहेत. जिथे केवळ पावसावर शेती अवलंबून आहे तेथील शेतक·यांचे प्रश्न समजून घेतले पाहिजेत. शेतक·यांना हे पटवून दिले पाहिजे की, आपण अवाढव्य बाजारपेठेचा भाग झालो आहोत. चीन आणि अमेरिकेच्या तुलनेत आपल्याकडे सुपीक जमिनीचे प्रमाण जास्त आहे, परंतु उपलब्ध जमिनीचे नको तितक्या लहान-लहान तुकडयात विभाजन होत आहे. इतक्या लहान-सहान तुकडयात काही किफायतशीर पीक घेताच येत नाही. जमिनीची उत्पादकता कमी होत आहे. यावर कांही एक धोरणात्मक निर्णय घेऊन, लहान शेतक·यांचे हित जपणारा आणि त्याचबरोबर एकूण कृषी धोरणाशी अथवा लागवडी खालील मोठया क्षेत्राशी समन्वय साधू शकणारा व्यावहारिक मार्ग काढणे आवश्यक आहे.

पी.साईनाथ (2005) :

यांनी आपल्या पुस्तिकेत अशी मांडणी केली आहे की, आज देशातील शेती व्यवसाय संकटात आहे. केवळ शेती आणि शेतकरीच संकटात आहे असे नसून संपूर्ण ग्रामीण समाज आणि अर्थव्यवस्था संकटात आहे, असे चित्र देशात असताना अर्थमंत्र्यांना मात्र दलाल स्ट्रीटवर बघून माझ्या सारख्याला शरम वाटते. शेती आणि शेतक·यांच्या दुरावस्थेची अनेक कारणे सांगितली जातात. त्यापैकीच एक महत्त्वाचे कारण म्हणून सरकारच्या शेतमाल आयात-निर्यात धोरणाकडे बघावे लागेल. सन 2002-03 मध्ये देशातील जनता भूकेने मरत होती. सरकार मात्र 1300 दशलक्ष टन धान्याची निर्यात 5.45 रु. प्रती किलो दराने करत होते. त्याचवेळी स्वस्त धान्य दुकानातील धान्य 6.40 रु. किलो दराने घेता-घेता आंध्रप्रदेशातील नागरिक मेटाकुटीला आले होते. या सौद्यात शेतक·याला सबसीडी मिळण्याऐवजी विदेशी गि·हाईक, निर्यातदार आणि व्यापा·यांना मिळत होती.

नगदी पीक घेण्याच्या प्रयोगात उत्पादन खर्च वाढल्यामुळे भारतातीलच नव्हे तर, जगभरातील छोटो शेतकरी कात्रीत सापडले आहेत. अपवाद फक्त पश्चिम युरोपचा तिथला शेतकरी संघटीत आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या निर्णयांना शह देण्याची ताकत त्यांच्यात आहे. भारतामध्ये शेती क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक वाढण्याऐवजी कमी कमी होत आहे. देशातील जवळपास सर्वच प्रकारची धोरणे अल्प भूधारक छोटया आणि काठावरच्या शेतक·यांच्या हिताविरुद्ध गेली आहेत. ज्या देशात 65 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे त्या देशात शेती बुडवून परिवर्तन अशक्य आहे. शेती धोक्यात तर सारा समाज धोक्यात ही काळया दगडावरील रेघ आहे.

एम. एस. स्वामीनाथन (2007) :

यांनी सन 2007 मध्ये आपल्या लेखात या विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे. भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचा नियतीशी करार असे विधान केले होते. तेव्हापासून भारताने वेगवेगळया क्षेत्रात प्रगती केली असली तरी, शेती क्षेत्रावर मात्र नौराश्य आणि विनाशाचे सावट असल्याचे दिसून येते. भारतातील 80 टक्के शेतकरी अल्प भूधारक किंवा छोटे शेतकरी आहेत. 63 टक्के शेती निव्वळ पावसाच्या पाण्यावर केली जाते. भूजल पातळी दिवसें-दिवस खालावत आहे. क्षारपड जमिनीच्या क्षेत्रातही वाढ होत आहे. शेती करणे परवडत नाही. बहुसंख्य शेतकरी कर्जबाजारी आहेत. पाण्याबरोबरच जमिनीसाठीही संघर्ष सुरु आहे. देशातील 40 टक्के शेतकरी पर्याय उपलब्ध झाल्यास शेती सोडून देण्यास तयार आहेत. हवामान बदलाचे संकट उभे आहे. प्रमुख पिकांची दर हेक्टरी उत्पादकता न वाढण्याची समस्या आहे. या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी वेगवेगळया स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. सर्वसमावेशक आर्थिक विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी शेतीचा गतीमान विकास साधने गरजेचे आहे.

सुलभा ब्रम्हे (2008) :

आपल्या पुस्तीकेत म्हणतात की, खासगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण (खाऊजा) धोरणामुळे देशातील शेतकरी देशोधडीला लागत आहेत. केवळ शेती आणि शेतक·यांचा प्रश्न आहे असे नागरी जनतेला वाटत आहे. शेतकरी हा बळीराजा, भारताच्या समृद्धीचा कणा, पण राज्यकर्त्यांनी हा कणाच मोडून टाकून भारताची सुजलाम-सुफलाम भूमी बहुराष्ट्रीय व बडया कंपन्यांना आंदन द्यायचे ठरवले आहे. शेतीसंबंधात आवश्यक वस्तूंच्या किंमतीमध्ये वेगाने वाढ झाली आहे. परीणामी शेतीचा खर्च वाढला, शेतमालाचे भाव मात्र अस्थीर आहेत, ऊस उत्पादक शेतक·यांनाही शेती करणे परवडत नाही. अल्प भूधारक शतक·यांची स्थिती अत्यंत बीकट आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात आणि एकूणच देशामध्ये लहान शेतक·यांची संख्या मोठी आहे. शेतीप्रधान देशातून शेतक·यालाच आयुष्यातून उठवले जात आहे, आज शेतकरी जात्यात आहे. भविष्यात याची झळ सर्वांनाच बसणार म्हणून सर्वांनी एकत्र येऊ व्यवस्थेच्या विरोधात लढा देणे आवश्यक आहे.

चंद्रकांत वानखेडे (2008) :

यांनी आपल्या "एका साध्य सत्यासाठी" या ग्रंथामध्ये शेतक·यांच्या विवंचनेची अत्यंत समर्पक मांडणी केली आहे. ते म्हणतात की देशभरात शेतकरी मरतो आहे, हे काही अचानक उद्भवलेले संकट नाही. सातत्याने शेतीची केलेली उपेक्षा व स्वातंत्र्योत्तर काळात राबवण्यात आलेले कायम शेतकरी विरोधी शासकीय धोरण याला जबाबदार आहे. आत्महत्या थांबवण्यसाठी केवळ पॅकेज उपयोगाचे ठरत नाही तर शेतक·यांच्या विरोधी धोरणे थांबवून हिताची धोरणे तयार करावी लागतील. देशातील राजकारणी, बुद्धीजीवी व नोकरशहा शेतक·यांबाबत कायम दुट्टपी भूमिका घेतात. शेतक·यांना उजव्यांनी शुद्र म्हणून तुडवायचे तर डाव्यांनी शोषक म्हणून लाथाडायचे सुरुच आहे.

झिरो बजेंटची शेती सांगणा·यांना ते ठणकावतात की शेती एकतर कमी खर्चाची किंवा जास्त खर्चाची असू शकते, ती झीरो बजेटची असूनच शकत नाही. शेतक·यांना शेती परवडत नसेल तर जोडधंदा करा म्हण·यांना ते म्हणतात की नोकरदारांना वेतनवाढ न मागता जोडधंदा करा असा उपदेश का करीत नाही? एकेकाळी देशाला अन्नधान्यासाठी अमेरिकेच्या मिलोवर अवलंबून रहावे लागत होते. शेतक·यांच्या काबाड कष्टामुळे देशाच्या हातातील भिकेचा कटोरा गेला. अन शेतकरी मात्र परावलंबी असुरक्षित झाला. कृषी विद्यापीठे ही पांढ·या हत्ती सारखी आहेत. ते मुळात संशोधनच करीत नाही आणि केलेच तर ते शेतक·यांच्या बांधापर्यंत पोहचवत नाहीत. आजपर्यंत शेतीविषयक अभ्यास मोठया प्रमाणात झाला पण शेतक·यांचा अभ्यास मात्र झाला नाही. शेतक·यांच्या आत्महत्येला (हलाखीला) शेतकरी जबाबदार नसून शासकीय धोरणच जाबाबदार आहे.

राजेश रपरिया (2010) :

यांनी सन 2010 मध्ये आपल्या लेखात या विषयाची चर्चा केली आहे. ते म्हणतात की, देशात सिमांत व अल्प भूधारक शेतक·यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सन 1970-71 मध्ये ती 69.7 टक्के इतकी होती. तर 2000-01 मध्ये 82 टक्केपर्यंत पोहोचली. शेतजमीनीशी संबंधित कायदे, वाढत्या लोकसंख्येचा दबाव आणि वारसा हक्काचे कायदे याला जबाबदार आहेत. कृषी अनुदानामध्येही दिवसें-दिवस कपात होत आहे.

व्ही. एस. व्यास (2011) :

यांनी सन 2011 मध्ये आपल्या लेखात या विषयावर मांडणी केली आहे. ते म्हणतात की, भारतीय कृषी क्षेत्रात मोठया प्रमाणात फेरबदल होत आहेत. अल्प भूधारक आणि कमी जमीन धारणा असणा·या शेतक·यांची संख्या वाढत आहे. एकूण धारणेत अल्प भूधारक शेतक·यांचे प्रमाण 83.5 टक्के इतके आहे. बहुसंख्य अल्प भूधारक शेतकरी दारिद्रय रेषेखाली आहेत, आणि ते सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गात मोडतात. लहान शेतजमीनीतून काहीही अतिरिक्त उत्पन्न मिळत

नाही. अल्प भूधारक शेतक·यांच्या उत्पन्नातील व खर्चातील फरक जेमतेम दरमहा रू. 655 इतका आहे. अल्पभूधारणा क्षेत्राला आर्थिकदृष्टया व्यवहार्य नफा मिळवून देणारे व्यावसायिक स्वरुप प्राप्त करून देणे, हेच आर्थिक धोरणाचे उद्दिष्ट असायला पाहिजे.

एस.महेंद्र देव (2012) :

एस. महेंद्र देव यांनी सन 2012 मध्ये "स्मॉल फार्मर्स इन इंडिया चॅलेंजेस अन्ड अपॉर्च्युनिटी" या शोध निबंधाच्या माध्यमातून भारतातील अल्प भूधारक शेतकऱ्यांचा अभ्यास केला आहे. या अभ्यासामध्ये ते नमुद करतात की, भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्र हे अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असून 56 टक्के कर्ती लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. 1991 नंतरच्या आर्थिक सुधारणांच्या काळात शेतीऐवजी इतर घटकावर लक्ष केंद्रीत केल्याने शेती हे एकमेव वंचित क्षेत्र राहिले. अल्प आणि सिमांत शेतक·यांचे प्रमाणात 80 टक्के इतके मोठे असल्याने भारतीय शेती हे अल्प व सिमांत शेतक·यांचे घर आहे.

लहान शेतक·यांचे उत्पन्न कमी व खर्च जास्त असल्याने ती गरीब आहे. इतर सामाजिक घटकांच्या तुलनेत अल्प भूधारक शेतक·यामध्ये अनुसूचित जाती-जमातीचे प्रमाण जास्त आहे, शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. जागतीकीकरणामुळे लहान शेतक·यांच्या नुकसानीत वाढ झालेली आहे. हवामान बदलाचा शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत आहे. शेतीला पाणी पुरवठयाचा प्रश्न गंभीर आहे. कृषी संशोधनावर अत्यंत कमी खर्च केला जात आहे.

संशोधन मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनासाठी अल्पभूधारक शेतकरी हा घटक निवडलेला असला तरी अभ्यासाच्या सोयीसाठी काही मर्यादा असून त्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. संशोधनासाठी कोल्हापूर जिल्हा हे मर्यादीत कार्यक्षेत्र निवडण्यात येणार आहे.

2. कोल्हापूर जिल्ह्यातील शहरे वगळून फक्त गावांची निवड अभ्यासासाठी करण्यात येणार आहे.

3. अल्प भूधारक शेतक·यांमध्ये 5 एकर व त्यापेक्षा कमी शेतजमीन असणा·या व स्वत: शेतजमीन करणा·या शेतक·यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

4. संशोधन कालावधी सन 1994-95 ते 2014-15 असा 20 वर्षाचा निवडण्यात येणार आहे.

5. संशोधनासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील 120 गावांमधून प्रत्येकी 5 अल्पभूधारक शेतक·यांची माहिती मुलाखत व अनुसूचीच्या माध्यमातून भरुन घेण्यात येणार आहे.

प्रकरण योजना :-

'कोल्हापूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतक·यांची सामाजिक-आर्थिक स्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास' या संशोधन विषयाची मांडणी विविध संशोधन पद्धती व तंत्राचा वापर करुन संशोधन अहवालाची विभागणी एकूण सहा प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

1 प्रकरण पहिले : प्रास्ताविक आणि संशोधन पध्दती :

प्रास्ताविक या पहिल्या प्रकरणामध्ये, शेतीचा उगम आणि विकास, शेती आणि शेतकरी संकल्पना, अल्प भूधारक शेतकरी व्याख्या, भारतातील, महाराष्ट्रातील व कोल्हापूर जिल्ह्यातील अल्प भूधारक शेतकरी व धारणक्षेत्र, धारणक्षेत्र व किफायतशिर धारणक्षेत्र, आर्थिक विकासातील शेतीचे महत्त्व इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे. या बरोबरच सदर संशोधनाला शास्त्रीय स्वरुप प्राप्त व्हावे म्हणून संशोधन विषयाची निवड, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधन समस्येचे निवेदन तसेच संशोधन पद्धती मध्ये संशोधन अध्ययनाचे क्षेत्र, संशोधन विषय, तथ्य संकलन, तथ्यांचा अर्थ व व्याख्या, तथ्य संकलनाचा अर्थ व व्याख्या तथ्य संकलनाच्या पद्धती, तथ्य संकलनासाठी संशोधकाने वापरलेली साधन सामग्री, पूर्व तपासणी, तथ्य विश्लेषण व सारणीकरण,

संशोधन कालावधी, संशोधन मर्यादा संशोधन अहवाल इत्यादी घटकांचाही अभ्यास करण्यात येणार आहे.

2 प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा अभ्यास :

संदर्भ साहित्याचा अभ्यास या दुस·या प्रकरणामध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने ज्या संशोधक, अभ्यासकांच्या लिखांनाच्या आधारेच संशोधन साहित्याचे पुर्नर्विलोकन करण्यात येणार आहे.

3 प्रकरण तिसरे : कोल्हापूर जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक ओळख :

कोल्हापूर जिल्ह्याची ओळख या तिस·या प्रकरणामध्ये कोल्हापूर जिल्ह्याची ऐतिहासिक पाश्र्वभूमी यात कोल्हापूर नावाची उत्पत्ती, प्राचिन इतिहास, मध्ययुगीन इतिहास, राजर्षी शाहू महाराज आणि आधुनिक इतिहास, कोल्हापूर जिल्हा निर्मिती व पुनर्रचनेचा इतिहास, कोल्हापूर जिल्ह्याची प्रशासकीय रचना, कोल्हापूर जिल्ह्याच्या भौगोलिक वौशिष्टयामध्ये भौगोलिक स्थान व रचना, हवामान, पर्जन्यमान, डोंगररांगा, जलप्रवाह, मुद्रा, नद्या, जंगल, खनिज संपत्ती, वन्यजीव, जलजीव, कोल्हापूर जिल्ह्याच्या आर्थिक वौशिष्टयामध्ये अल्प भूधारक शेतक·यांची मोठी संस्था, जमिनीचा वापर, सिंचन सुविधा, मुख्य पीके व त्याखालील क्षेत्र, कृषी उत्पादन साठवणूक व पणन/विक्री, पशुधन, पशुवौद्यकीय सुविधा आणि उत्पादने, उद्योग, वाहतूक व दळणवळण, बँका व विमा कंपन्या, बचत गट, जिल्हा उत्पन्न, जिल्हा दरडोई उत्पन्न, लोकसंख्या, पर्यटन स्थळे, इत्यादी घटकांच्या अनुषंगाने अभ्यास करण्यात येणार आहे.

4 प्रकरण चौथे :- अल्प भूधारक शेतक·यासाठी शासकीय धोरणे आणि योजना :

सदर चौथ्या प्रकरणामध्ये जिल्हा परिषदेच्या विविध शासकीय योजना, महाराष्ट्र शासनाने कृषीरत्न पुरस्कार, पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद कोल्हापूरच्या वतीने राबविण्यात येणा·या योजना, जल व जलसिंचन विषयक योजना, फळबाग लागवड विषयक योजना, पुष्प लागवड विषयक योजना, भाजीपाला उत्पादन व विक्री विषयक योजना, औषधी वनस्पती उत्पादन व

संवर्धन विषयक योजना, धान्य व वौरण विकास अनुदान योजना, हरीतगृह, शितगृह व साठवण विषयक अनुदान योजना, कृषी पणन महामंडळाच्या योजना, शेंद्रीय शेती विषयक अनुदान योजना, पणन विभागाच्या योजना, सहकार विभागाच्या योजना, मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने राबविण्यात येणा·या योजना, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाच्या अनुदान योजना, नाबार्डच्या विविध योजना व इतर काही महत्त्वाच्या योजनांचा समावेश करण्यात येणार आहे.

शेती विषयक धोरणामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील शेती विषयक धोरण, स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय कृषी विषयक धोरण, पंचवार्षिक योजना काळातील कृषिनीती, राष्ट्रीय कृषी धोरण 2000, राष्ट्रीय शेतकरी धोरण 2007 इत्यादी धोरणांचा व जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतक·यांनी लाभ घेतलेल्या विविध शासकीय योजनांचा व त्या आधारे काढण्यात आलेल्या निष्कर्षाचा आढावा घेण्यात येणार आहे.

5 प्रकरण पाचवे : कोल्हापूर जिल्ह्यातील अल्प भूधारक शेतक·यांची सामाजिक आर्थिक स्थितीचा अभ्यास :

प्रस्तुत प्रकरण हे पूर्णपणे मुलाखत व अनुसूचीवर आधारीत आहे. मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून अल्प भूधारक शेतक·यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या आधारे तक्ता व आलेखाच्या सहाय्याने विश्लेषण करण्यात येणार आहे. यामध्ये शेतकरी उत्तरदात्यांची व्यक्तीगत माहिती व सामाजिक आर्थिक माहितीवर आधारीत प्रश्नांच्या माध्यमातून माहिती गोळा करुन त्या माहितीवर योग्य ते संस्कार करुन अनावश्यक माहिती वगळून विश्लेषण करण्यात येणार आहे व शेवटी गृहितकांची पडताळणी करण्यात येणार आहे.

6 प्रकरण सहावे : निष्कर्ष आणि शिफारशी :

निष्कर्ष व शिफारशी या सहाव्या आणि शेवटच्या प्रकरणामध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने अभ्यासलेल्या माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्यात येणार असून त्या निष्कर्षास अनुसरुन महत्त्वाच्या शिफारशी करण्यात येणार आहेत.

संदर्भ :

1) गंगाधर वि. कायंदे पाटील, 2008, 'शेतीचे अर्थशास्त्र' चौतन्य पब्लिकेशन, नाशिक.

2) पुरुषोत्तम खेडेकर, 2017, 'शेतपती नव्हें ... उद्योगपती व्हा..!' जिजाई प्रकाशन, पुणे.

3) सुरेश फुले, 2012, 'कृषी भूगोल', विद्याभारती प्रकाशन, लातूर.

4) मुकुंदराव गायकवाड, 2008, 'भारताचे कृषी अर्थशास्त्र', कॉन्टिनेटल प्रकाशन, विजयानगर पुणे.

5) 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती, मंडळ मुंबई.

6) एस.व्ही. ढमढेरे, 2008, 'भारतीय अर्थव्यवस्था', डायमंड पब्लीकेशन, पुणे.

7) सुनिल चव्हाण, 2015, 'प्ॅकेज, अनुदाने तारक की मारक ?' दै. महाराष्ट्र टाईम्स, जानेवारी, 18.

8) मधुसुधन साठे, 2008, 'भारताच्या आर्थिक समस्या', डायमंड पब्लिकेशन, पुणे पृष्ठ क्र. 16.

9) देसाई, भालेराव, 'भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन पुणे, पृष्ठ क्र. 202.

10) विजय कवीमंडन, 1990, 'आर्थिक विचारांचा विकास', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

11) चंद्रकांत वानखेडे, 2014, 'पुर्नविचार मागोवा सहज सूचलेल्या विचारांचा आणि विचारातून निसटलेल्या अर्थव्यवस्थेचा', मनोविकास प्रकाशन, पुणे

12) एम.एस.स्वामीनाथन, 'कृषीक्षेत्रात भारताचा नियतीशी' करार योजना वर्ष 35 अंक -1, ऑगस्ट 2007.

13) विलास रणसुभे, मे, 2012 'शेती वाचवा देश वाचवा', श्रमिक पब्लिकेशन, कोल्हापूर.

14) एस. के ढगे, सी. पी. हासे, 2011, 'संशोधन पद्धती', के.एस. पब्लिकेशन-पुणे.

15) आगलावे प्रदिप (2000) संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन, नागपूर.

16) भांडारकर पु. ल. (1999) सामाजिक शास्त्र संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती, औरंगाबाद, आवृत्ती 4 थी.

17) घाटोळे रा. ना. समाजशास्त्री संशोधन तत्वे व पध्दती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

संशोधनार्थी

प्रा. जगदीश केशवराव ससाणे
सहयोगी प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग,
टी. के. कोलेकर कला व वाणिज्य
महाविद्यालय, नेसरी,
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. डी. एन. दामावले
सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभागप्रमुख,
पंडीत दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय,
देवणी, जि. लातूर